# विश्वबंधुत्व

मराठी थिऑसॉफिकल फेडरेशनचे द्वैमासिक

जून – जुलै – ऑगस्ट २०२०

# मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन

प्रकाशक
अध्यक्ष
मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन

वर्ष २०२० जून – जुलै – ऑगस्ट २०२० अंक ५

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक / लेखक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | संपादकीय<br>बंधु (अॅड.) संजय दि. पोटे | ३ |
| २. | कर्मे ईशु भजावा<br>बंधु डॉ. ए. एस. सोनोने, अकोला. | ६ |
| ३. | एच. पी. बी. यांचे जीवन<br>बंधु डॉ. भा. द. तेंडूलकर, पूना लॉज. | ८ |
| ४. | थिऑसॉफिस्टची कर्तव्ये | २० |
| ५. | दामोदर आणि थिऑसॉफिकल चळवळ<br>प्रेषक – बंधु नितीन अभ्यंकर, पुणे. | २१ |
| ६. | लॉज वार्ता | २६ |


**या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील मतांशी संपादक मंडळ आणि मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन सहमत असेलच असे नाही.**

**वार्षिक वर्गणी : रु. १००/–**

**(आजीव सदस्य – १५ वर्षे – रु. १०००/–)**

# संपादकीय

विश्वबंधुत्वाचा हा अंक जून-जुलै- ऑगस्ट असा एकत्रित देत आहोत. द्वैमासिकासाठी हा अंक अपवाद! हयामुळे पुढील वर्षापासून जानेवारी ते डिसेंबर अशी ६ अंकांची त्या त्या वर्षाची श्रृंखला पूर्ण करता येईल. आजच्या घटकेला कोरोनाच्या महामारीमुळे उदभवलेली परिस्थिती काही देशांमधे सावरू लागली आहे. आपल्या देशात मार्च अखेरीस सुरू झालेले शासकीय निर्बंध जून मध्यंतरापासून थोड्या प्रमाणात सैल करण्यात आले असले तरी आज रोजी करोनाचा प्रभाव कमी झालेला नाही. सहाजिकच थिऑसॉफिकल लॉजमधील सभा व उपक्रम अजूनही सुरू होऊ शकलेले नाहीत. असे असले तरीही ई-तंत्रज्ञानाद्वारे थिऑसॉफीचा अभ्यास व त्यासंबंधीच्या माहितीची देवाणघेवाण काही गटांद्वारे (ग्रुपस्‌द्वारे) सुरू राहिलेली आहे. ह्या गटांद्वारे अभ्यासक व विचारवंत सोशल मिडियाच्या माध्यमातून एकमेकांच्या संपर्कात आहेत. ह्याच संदर्भात एक उपक्रम नमूद करावासा वाटतो; तो म्हणजे पूना लॉजमधे प्रत्येक रविवारी अखंडपणे सूरू असणारी 'भारत समाज पूजा'! थिऑसॉफीवरील व्याख्यानांचे ऑडिओ आणि व्हिडिओ, जे. कृष्णमूर्तींच्या पुस्तकावरील विवचने, 'साधनचतुष्टय' चा अभ्यास, थिऑसॉफी आणि संतवाङ्मय, थिऑसॉफीच्या बोधचिन्हांचा अभ्यास, मॅडम ब्लॅव्हॅटस्की यांची शिकवण, ध्यानधारणेसंबंधी माहिती इ. नानाविध विषय ह्या गटांवर अभ्यासण्यात आले हे प्रशंसनीय आहे.

अभ्यासकांपासून प्रेरणा घेऊन म. थि. फे. ने त्रैमासिक सभा ही ऑनलाईन व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे १२ जुलै रोजी आयोजित केली. सभेमधे कार्यकारिणीच्या बहुसंख्य सदस्यांनी भाग घेतला. ज्या काही मुद्यांवर चर्चा झाली त्यातील दोन महत्वाचे मुद्दे असे -

थिऑसॉफीचा प्रचार आणि प्रसार होण्याच्या दृष्टीकोनातून इंडियन सेक्शनने म. थि. फे ला जे 'स्मार्ट गोल्स्' दिलेले होते, त्यातील जवळजवळ ४०% स्मार्ट गोल्स् म. थि. फे. ने फेब्रुवारी अखेरपर्यंत पूर्ण केले आणि ह्यासाठीच्या खर्चाच्या परताव्याची वाट न बघता कार्यपूर्ततेवर भर दिला.

दुसरा महत्वाचा मुद्दा आहे तो म. थि. फे. च्या वार्षिक अधिवेशनाचा! सप्टेंबर २०२० मधे नंदुरबार येथील नियोजित अधिवेशन हे दरवर्षीप्रमाणे एकत्र

येऊन सभांद्वारे न करता ऑनलाईन घेण्यात यावे असे ठरले. थिऑसॉफिकल लॉज नंदूरबार हेच या अधिवेशनाचे आयोजक असतील. या अधिवेशनाचा मुख्य विषय ''**थिऑसॉफी आणि सध्याची वैश्विक आपत्ती**'' **(Theosophy and present global disaster)** असा ठरवण्यात आला. हा विषय तसा बऱ्याच अंशी खुल्या स्वरूपाचा आहे आणि म्हणूनच या विषयावर त्यांचे विचार मांडणारे वक्ते आणि ते ग्रहण करणारे श्रोते यांच्यासाठी हे अधिवेशन मोठी पर्वणी ठरेल ही आशा आहे. थिऑसॉफिकल सोसायटीच्या सभासदांनी, गैरसभासद अभ्यासक आणि विचारवंतांनी या ऑनलाईन अधिवेशनासाठी आपला सक्रीय सहभाग नोंदवावा असे आवाहन करत आहोत.

आंतरराष्ट्रीय थिऑसॉफिकल सोसायटीचे १४५ वे वार्षिक अधिवेशन देखील ऑनलाईन होणार आहे. दि. २७ ते ३० डिसेंबर २०२० दरम्यान होणाऱ्या या अधिवेशनाचा प्रमुख विषय **"Cycles of Awareness"** असा आहे. थिऑसॉफिकल सोसायटी, अड्यारच्या वेबसाईटवर यासंबंधीची माहिती उपलब्ध होईल.

आपण थिऑसॉफीचे अभ्यासक आहोत. आपण थिऑसॉफिकल सोसायटीचे सदस्य असू वा नसू परंतु आपण थिऑसॉफीशी संलग्न आहोत हे आपणास मिळालेले एक देणंच आहे असे म्हणावयास हरकत नसावी. We are lucky to be in Theosophy असे बरेचदा सांगण्यात येत असले तरी आपण थिऑसॉफीशी संलग्न आहोत हे कोणत्या अर्थाने हे थोडंफार कळून घ्यायला हवे. थिऑसॉफीमधे जीवनातील सत्याचा शोध घेण्यासाठीचे सखोल व महत्वपूर्ण ज्ञान आपणास उपलब्ध झाले आहे म्हणा किंवा अशा अद्धितीय ज्ञान प्राप्त करीत असलेल्या व्यक्ती-समुहाशी आपला संबंध प्रस्थापित झाला आहे या अर्थाने आपली नशीबवान असण्याची अवस्था असावी. थिऑसॉफिकल सोसायटीच्या ऐतिहासिक व दैदीप्यमान परंपरा असलेल्या व जगभर चालणाऱ्या थिऑसॉफीसंबंधीच्या विस्तृत कार्याचा आपणदेखील एक भाग आहोत म्हणूनही कदाचित आपणास नशीबवान संबोधण्यात येत असावे.

जगभरातील एकूण सुशिक्षित, विद्वान, ज्ञानी व विचारवंत व्यक्तींच्या संख्येच्या तुलनेने थिऑसॉफीचा अभ्यास करावयाची संधी मिळालेल्या आपणा सर्वांची संख्या तशी नगण्यच! तरीदेखील थिऑसॉफीच्या गुणवत्तापूर्ण ज्ञानावर आधारीत विश्वबंधुत्वासाठीचे कार्य, वैश्विक सत्यशोधन कार्य, सुप्त

निसर्गनियम समजून घेण्याचे कार्य, गूढविद्यांचे अध्ययन इ. विविध कार्यामधे कार्यरत असणाऱ्या व्यक्ती-समुहाच्या सान्निध्यात येणे ही आपणास मिळालेली एक अनमोल संधीच म्हणावी लागेल.

नशीबवान लोकांना सर्व काही सहज मिळते असे नाही. बाकीच्यांप्रमाणे त्यांनादेखील त्यांचे इप्सित साध्य करण्यासाठी धडपडावे लागते, कष्ट घ्यावे लागतात. थिऑसॉफीच्या अंतरंगाचा पुरेसा बोध घेण्यासाठी, थिऑसॉफीचे योग्य आकलन होण्यासाठी बरीच वर्षे लागू शकतील. त्यामुळे आपणास हे अमुल्य ज्ञान किंवा बोध सहजच मिळेल असे नाही. एक महत्वाचे वास्तव्य आपण समजून घ्यायला हवे की थिऑसॉफीचा अभ्यास ही निरंतन चालणारी प्रक्रिया आहे. थिऑसॉफी प्रात्यक्षिक अभ्यास आहे - आत्मसात करण्याजोगा. आचरणात आणण्याजोगा अभ्यास! त्यामुळे थिऑसॉफीची आवड ही आपल्या जीवनाशी निरंतरपणे निगडीत हवी. ती सहाजिकच जोपासली जाईल आणि मग कोणत्याही आंतरिक वा बाह्य विरोधाचा किंवा प्रतिकूल परिस्थितीचा ह्यावर परिणाम होणार नाही. त्यामुळेच आपण आपल्या वयाकडे, उपलब्ध साधन सामुग्रीकडे, अनुभवाकडे फारसे लक्ष न देता, थिऑसॉफीतील आवड व सातत्य याकडेच लक्ष केंद्रित करावयास हवे. थिऑसॉफीची आवड आणि याप्रती आपली निष्ठा हीच आपली गुणवत्ता - नशीबवान असण्याची!!

आपणा सर्वांना उत्तम आरोग्य लाभो ही प्रार्थना.

आपला बंधु<br>
संजय दि. पोटे (ॲड.)<br>
अध्यक्ष, म.थि.फे., पुणे.

---

**Mahatma Says**

1. As for human nature in general, it is the same now as it was a million of years ago; Prejudice based upon selfishness; a general unwillingness to give up an established order of things for new modes of life and thought - and occult study requires all that and much more - pride and stuborn resistance to Truth if it but upset their previous notions of things, such are the characteristics of your age, and especially of the middle and lower classes.

# कर्मे ईशु भजावा

**अनुवाद – बंधु डॉ. ए. एस. सोनोने**

''**कर्मे ईशु भजावा**'' ही ओवी ज्ञानेश्वरीतील आहे. ज्ञानेश्वरी ही गीतेवरील टीका आहे. कर्मापासून परावृत्त झालेल्या अर्जुनाला स्वकर्माची जाण करून देण्यासाठी गीतेचे प्रयोजन आहे. एक प्रकारे गीता कर्मयोग शिकवते. कर्माचा सिद्धांत आणि पुर्नजन्माचा सिद्धांत या दोन्ही सिद्धांताचे विवेचन गीतेमधे आलेले आहे. थिऑसॉफीमधे यावर विस्तारपूर्वक लिखाण व संशोधन डॉ. ॲनी बेझंट आणि लेडबीटर यांनी केले आहे. 'लाईव्हस् ऑफ अल्सिओनी' या ग्रंथात जे. कृष्णमुर्ती यांचे मागील अनेक जन्म तपासण्यात आले आहेत. मुळातून गीता आणि उपनिषद समजून घेण्यासाठी डॉ. ॲनी बेझंट यांनी संस्कृत भाषेचा अभ्यास केला, त्या भाषेमधे पारंगतता मिळवली आणि त्यांनी 'सर्व शुक्ला सरस्वती' ही उपाधीही मिळवली. त्यानंतर त्यांनी गीतेवर आणि उपनिषदांवर लिखाण केले व भाषणे दिली. त्यांनी कर्माच्या सिद्धांतावर भरपूर लिखाण केले आहे ते मुळातून वाचणे गरजचे आहे.

कर्माचा सिद्धांत आणि पुर्नजन्माचा सिद्धांत एकमेकांशी रिलेटेड आहेत. कर्माचे संचित, प्रारब्ध आणि क्रियमाण असे तीन प्रकार पडतात. मागील अनेक जन्मात साचलेले कर्म **संचित** म्हणून जमा होते. यातून विद्यमान जन्मात जे कर्म आपण फेडतो त्याला **प्रारब्ध** कर्म असे म्हणतात. आणि या चालू जन्मात जीवन जगताना होणारी कर्मे ही **क्रियमाण** कर्मे आहेत. आपल्याला संचित माहीत नाही, प्रारब्धही माहीत नाही. मग आपल्या हातात आहे फक्त क्रियमाण कर्म. मी कर्मभूमी आहे. 'जसे पेराल तसे उगवेल'. म्हणून संत ज्ञानेश्वर म्हणतात –

**उचित कर्मे आघवी**
**तुवा आचोनी मज अर्पावी**

कर्म करताना योग्य कर्मे ईश्वरार्पण बुद्धीने करावी म्हणजेच कर्तेपणाचा अहंभाव टाकून करायची आहेत. कर्तेपणाचा अहंभाव–रहित उचित कर्म ही निष्काम कर्म आहेत.

**अगा कर्तेविन कर्म**
**तिची ते नैशकर्म**
**हे आणखी सवर्म गुरू गम्य जे**

जशी कर्मे चांगली वाईट असतील त्याप्रमाणे त्याचे फळ आहे. संत तुकाराम म्हणतात –

**तुका म्हणे कर्म रेखा**
**न चुके ब्रह्मादिका**

सृष्टीची उत्पत्ती करणाऱ्या ब्रह्मदेवालासुद्धा कर्माचे फळ सुटत नाही. एवढेच काय तर देवादी देव इंद्र – त्यालासुद्धा परत मृत्युलोकामधे जन्म घ्यावा लागतो. संत ज्ञानेश्वर म्हणतात –

**जेथ पुण्याची पाहूति सरे**
**सर्वे ची इंद्रपणाची उटी उत्तरे**
**येऊ लागती माघारे मृत्युलोका**

इंद्रादिक देवांचीसुद्धा ही अवस्था आहे. संचित कर्म समूळ नष्ट झाल्याशिवाय मुक्ती नाही. कर्म आहे म्हणून पुन्हा जन्म आहे.

राजा परिक्षिताची कथा आपल्या सर्वांना माहीत आहे. अश्वत्थामाने पांडव कुळाच्या नाशासाठी ब्रह्मास्त्र सोडले होते. त्यावेळी कृष्णाने अभिमन्यूची पत्नी उत्तरा हिच्या गर्भात असलेल्या परिक्षिताचे सुदर्शनचक्राच्या आधारे संरक्षण केले. हाच बालक परिक्षित म्हणून जन्माला आला. गर्भातच त्याला भगवान कृष्णाचे दर्शन झाले होते. तरीसुद्धा त्याच्या हातून ऋषीच्या गळ्यात मेलेला साप टाकण्याची अक्षम्य चूक घडली आणि ती चूक त्याच्या मृत्युला कारणीभूत ठरली.

**केले कर्म झाले तेचि भोगा आले**
**उपजले मेले ऐसे किती**

या भूतलावर असंख्य जीव जन्म घेतात आणि मरतात. म्हणून कर्माचा सिद्धांत जाणून घ्या आणि त्याप्रमाणे जगा. म्हणून कर्म करताना सावधान. गीतेच्या म्हणण्याप्रमाणे

**परफेक्शन इन ॲक्शन इज योगा.**

★★★

# एच्. पी. बी. यांचे जीवन

– बंधु भा. द. तेंडूलकर, पूना लॉज

**(बोरीस डी. झिरकॉफ, एच्.पी.बीं च्या वडिलांचे निकटवर्ती आणि त्यांच्या 'कलेक्टेड रायटिंग्ज'च्या २५ खंडांचे संपादक यांच्या लेखावरून)**

**कौटुंबिक पार्श्वभूमी** : एच्.पी.बीं चे वडील जर्मन कुटुंबातील. सुमारे तेराशे वर्षांपूर्वी ह्या जर्मन कुटुंबाने रशियामध्ये स्थलांतर केले. एच्.पी.बीं ची आजी, राजकन्या डोल्गोरूकी ही प्राचीन रशियन कुटुंबातील. डोल्गोरूकी यांचे अनेक कुटुंबीय खानदानी रशियन कुटुंबात सोयरिक झालेले आणि रशियाच्या इतिहासात उच्च पदांवर विराजमान झालेले नामवंत होते. त्यापैकी एक-दोघींना सम्राज्ञीपदही प्राप्त झाले. एच्.पी.बीं चे कुटुंब रशियामध्ये अनेक कारणांमुळे सुपरिचित होते परंतु एच्.पी.बीं च्या दृष्टीने ही कौटुंबिक पार्श्वभूमी विशेष महत्त्वाची नव्हती. व्यक्तीचे पूर्वज कोण हे पाहण्यापेक्षा तिच्या चारित्र्याकडे लक्ष देणे महत्त्वाचे. तथापि कौटुंबिक पार्श्वभूमीचे एक निश्चित स्थान असते, कारण वंशपरंपरेने उत्क्रांत झालेली गुणवैशिष्ट्ये एच्.पी.बीं च्या स्वभावात संक्रमित झालेली होती.

**अस्थिर बालपण** : एच्.पी.बीं.चा जन्म ३०/३१ जुलै १८३१ च्या रात्री (रशियामध्ये त्यावेळी प्रचलित असलेल्या जुन्या पंचांगानुसार) झाला. ह्या विशिष्ट रात्री जन्माला आलेल्या बालकांचा निसर्गशक्ती (Elemental Forces) वर अंमल चालतो अशी समजूत रशियन लोकसमुदायामध्ये लोकप्रिय आहे. साहजिकच एच्.पी.बीं च्या बाबतीत ही सकृतदर्शनी भविष्यवाणीच ठरली. एच्.पी.बीं चे वडील रशियाच्या अश्वदळामध्ये होते आणि त्यांच्या तुकडीचा मुक्काम गावोगावी असेल त्याप्रमाणे ते फिरतीवर असत. त्यांची आई सतत आजारी असल्यामुळे कुटुंबाकडे आणि विशेषतः मुलांकडे लक्ष देणे शक्य होत नसे. सतत बदलणाऱ्या वास्तव्यामुळे त्यांचे सुरूवातीचे बालपण अस्थिरतेने ग्रासलेले होते हे त्यांचे सुदैव आणि दुर्दैवही होते. त्यांच्या आईचे व्यक्तिमत्त्व वाखाणण्यासारखे होते. महिलांच्या अधिकारासाठी लढा देणाऱ्या त्या पहिल्या रशियन महिला होत. त्या नामवंत लेखिका होत्या. त्यांनी लिहिलेल्या कादंबऱ्या तत्कालिन रशियन साहित्यात प्रथम श्रेणीच्या ठरल्या.

आजारपणामुळे तरूणपणातच त्यांना मृत्यू आला. त्यांची आई आणि वडील कर्नल पीटर व्हॅन हॉन यांचे संबंध फारसे परस्पर पूरक नव्हते त्यामुळे लवकरच एच्.पी.बीं ना त्यांच्या आजी-आजोबांकडे पाठविण्यात आले. परिणामी त्यांचे बालपण थोडे सुखकर झाले.

एच्.पी.बी हे एक असामान्य बालक होते हे आपण लक्षात घेतले पाहिजे. एक संवेदनशील माध्यम म्हणून त्यांच्या आजूबाजूला विविध प्रकारच्या चित्र-विचित्र घटना घडत असत. त्यांच्या ठिकाणी वसत असलेल्या माध्यमिक आणि मानसिक शक्तींच्या संचारावर अनेक वर्षेपर्यंत त्यांचे अजिबात नियंत्रण नव्हते. अनेक लोकांना - यात त्यांची बहिण व्हेरा हिचाही समावेश होतो - आलेले संशयातीत अनुभव लक्षात घेता असे म्हणता येईल की, वरील विधानात सत्यकथनाखेरीज कोणतीही काल्पनिकता नाही. त्यांच्या बालपणाचे ते केवळ वास्तव आहे. अगदी सुरूवातीपासूनच एच्.पी.बी. ही अत्यंत कणखर इच्छाशक्ती लाभलेली व्यक्ती होती.

वयाच्या अठराव्या वर्षी, अल्पवयीन असतानाच झालेले त्यांचे लग्न ही सुद्धा विचित्र घटना आहे. कोणत्याही प्रकारचे वैवाहिक जीवन जगण्यासाठी त्या अनुरूप नव्हत्या. त्यांच्या लग्नाचे नेमके कारण माहित नाही, कारण त्यापूर्वीच त्यांनी शिष्यत्व पत्करले होते असे दिसते. विलक्षण जागृत अवस्थेमध्ये वावरणारी ही व्यक्ती खरे तर सर्व प्रकारच्या कौटुंबिक बंधनापासून दूर जाण्याच्या प्रयत्नात होती. सभोवतालच्या सर्वच गोष्टींपासून स्वतःची सुटका करून घेण्यासाठी त्यांनी हा मार्ग चोखाळला असेल ही शक्यताच जास्त. विकीफॉर ब्लॅव्हॅट्स्की ह्या पुष्कळच प्रौढ व्यक्तीशी त्यांनी प्रत्यक्ष विवाह केला. अनेक पुस्तकांमध्ये ते जनरल होते असा उल्लेख असला तरी कॉकेससच्या प्रशासनात ते सनदी नोकर होते ही वस्तुस्थिती आहे. एच्.पी.बी. त्यांच्यापासून पळून गेली आणि अशा प्रकारे त्यांची रशियन पार्श्वभूमी संपुष्टात आली. बोटीने त्या कॉन्स्टंटिनोपल येथे गेल्या आणि त्यांच्या जगभरच्या विविध विलक्षण सफरींची सुरूवात झाली.

त्यांच्या जगभराच्या प्रवासासाठी लागणारे अर्थसहाय्य त्यांना वडिलांकडून मिळाले. याबाबतीत बापलेकीचे नाते अत्यंत घट्ट होते. ती कुठे आहे हे त्यांना नेहमी माहित असायचे व त्यानुसार ते तिला पैसे पाठवित असत. पुढील दहा वर्षे पुष्कळसा कालखंड त्यांनी प्रवासात व्यतीत केला. १८५० ते १८५८

च्या दरम्यान दोन वेळा त्यांनी अमेरिकेस भेट दिली. त्या काळात त्यांचे वास्तव्य सांता फे, न्यू मेक्सिको, फ्लोरिडा इ. ठिकाणी होते. कॅनडामध्ये त्यांनी भारतीयांचा शोध घेतला. इतर अनेक स्थळांना त्यांनी भेटी दिल्या, परंतु त्याची नोंद उपलब्ध नाही. त्यांनी मध्य अमेरिकेतील होंडुरास, थुकेतान, मेक्सिको, पेरू इ. अनेक प्रदेशातून संचार केला असेल अशी दाट शक्यता आहे कारण त्यांना सिद्ध संघाच्या गुप्त केंद्रांशी संपर्क साधावयाचा होता. त्यांना जे कार्य पार पाडावयाचे होते, त्याच्या तयारीसाठी त्यांनी अनेक गूढ केंद्रांना निश्चितच भेटी दिल्या असतील; परंतु त्याविषयी विशेष माहिती उपलब्ध नाही. दहा वर्षांच्या त्यांच्या ह्या भ्रमंतीविषयी काही पुरावे उपलब्ध असले तरी त्याच्या आधारे सखोल आणि सुसंबद्ध विवेचन करणे ही खूपच अवघड गोष्ट आहे. ह्याच कालखंडामध्ये तिबेटमध्ये प्रवेश करण्याचा त्यांचा प्रयत्न विफल ठरला. किमान दोन वेळा त्यांनी असा प्रयत्न करून पाहिला, परंतु त्यात त्या अयशस्वी ठरल्या. साधारणपणे १८५६ आणि १८५७ मध्ये केलेल्या असफल प्रयत्नानंतर त्या मायदेशी रशियाला पुन्हा परतल्या. त्यांच्या पुनरागमनामुळे त्यांचे कौटुंबिक जीवन खूपच प्रभावीत झाले. त्यांच्या ठिकाणी असलेल्या माध्यमिक आणि मानसिक शक्ती अजूनही पूर्णपणे त्यांच्या नियंत्रणाखाली आल्या नव्हत्या. रशियामध्ये असताना एक शक्तिशाली माध्यम अशीच त्यांची सर्वांना ओळख होती. परंतु बारकाईने अवलोकन करणाऱ्यांच्या हे लक्षात येत असे की, सर्वसाधारण माध्यमांना ज्या शक्तींचे नियंत्रण करणे शक्य नसे, त्यांच्यावर एच्.पी.बीं नी ताबा मिळविला होता. १८५८ मध्ये त्या रशियात परतल्या आणि सुमारे सहा वर्षे १८६४ पर्यंत त्या तेथे राहिल्या. ह्या काळात, विशेषतः १८६२–६३ च्या दरम्यान त्यांच्यामध्ये अनेक आंतरिक बदल घडून आले. त्यावेळी त्यांचे वास्तव्य बहुधा कॉकेशसमध्ये असावे.

ह्या बदलानंतर आपल्या मनःशक्तिंवर व स्वभावावर त्यांनी आपला पूर्ण अंमल प्रस्थापित केला. हा बदल शिष्यत्व/दीक्षाप्राप्तीच्या संदर्भातील कसोट्यांना सामोरे जाताना सहन कराव्या लागणाऱ्या यातना; परिणामी लाभणारे यश यांचेच द्योतक होते असे वाटते. उपलब्ध माहितीनुसार असे दिसते की, १८६४ मध्ये रशिया सोडून जाताना एच्.पी.बी. ही पूर्णपणे भिन्न व्यक्तिमत्त्वाची महिला होती. त्यांच्यातील प्रखर मानसिक वैशिष्ट्याची धग आता पूर्णपणे थंडावली होती. आता त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रयोगशील, स्थिर,

अध्यात्मप्रवण झाले होते. श्री. ए. पी. सिनेट यांच्या मादाम ब्लॅव्हॅट्स्कींच्या जीवनातील प्रसंग – 'Incidents in the Life of Madam Blavatsky' ह्या पुस्तकात ह्या स्थित्यंतराचे सविस्तर वर्णन आलेले आहे.

कॉकेशसमधील त्यांचे वास्तव्य प्रामुख्याने टीफ्लिस (Tiflis) येथे होते. आश्चर्य असे की, या ठिकाणी अनेक प्रकारचे व्यवसाय हाताळण्याचा त्यांनी प्रयत्न केला. अशाच एका व्यवसायाचा तपशील उपलब्ध आहे. कॉकेशसच्या पर्वतराजीतील सागवान वृक्षांच्या ओंडक्यांची जहाजामधून ब्लॅक-सीच्या एका बंदरातून वाहतूक करण्याचे काम करवून घेण्याची जबाबदारी त्यांनी स्विकारली होती. अशा अनेक व्यवसायात त्यावेळी त्या गुंतल्या होत्या. हे खात्रीपूर्वक सांगणे अवघड असले तरी, असे म्हणता येईल की ज्या पारलौकिक कार्यामध्ये त्या गुंतल्या होत्या. त्यांना वरवर झाकून टाकणारे हे व्यवसाय हे केवळ दृष्य आवरण होते.

रशियामध्ये पाच-सहा वर्षे कुटुंबियांसमवेत रहात असताना, त्यांच्या अंतर्यामी विकसित होत असणाऱ्या गूढ, अध्यात्मिक शक्तिंचा प्रत्यक्ष अनुभव त्यांच्या कुटुंबियांना येत होता. त्यांची बहिण व्हेरा (Vera) यांच्या दैनंदिनीमध्ये ह्या पुष्ट्यर्थ पुष्कळ मजकूर आढळतो. त्यांच्या कुटुंबामध्ये आणि परिचित मित्रपरिवारामध्ये ह्या काळात मनोव्यापाराशी निगडीत अशा अनेक गूढ घटना घडल्या आणि त्यामुळे लोकांमध्ये पुष्कळ खळबळ माजली. त्यांचे संपूर्ण सुसंगत स्पष्टीकरण उपलब्ध नाही. त्यांच्या कुटुंबातील आणि मित्रपरिवारातील अनेक सभासद मृतात्म्यांचा जिवंत माणसांशी संपर्क आणि संवाद यामध्ये रस घेणारे स्पिरिच्युॲलिस्ट होते आणि त्यांनी अध्यात्मिक, पारलौकिक संदर्भ सोडून एच्.पी.बीं च्या जीवनातील घटनांचा वेगळाच अर्थ लावला. त्यामुळे त्यांच्या कुटूंबात आणि मित्रपरिवारामध्ये त्यांच्या आगमनामुळे एकच खळबळ माजून राहिली आणि त्यामुळे त्या घटना संस्मरणीय ठरल्या. त्यांची बहीण व्हेरा यांची दैनंदिनी मूळ स्वरूपात प्रसिद्ध झाली नाही; परंतु ए. पी. सिनेट यांनी प्रथम 'memories of Madam Blavatsky' ह्या नावाने जे पुस्तक लिहिले त्याचे नाव एच्.पी.बी. यांच्या तीव्र आक्षेपामुळे आणि आग्रहामुळे 'Incidents in the Life of Madam Blavatsky' असे बदलण्यात आले आणि त्यामध्ये त्यांची बहिण व्हेराने तिच्या दैनंदिनीमध्ये नमूद केलेल्या प्रत्यक्ष घटनांचा समावेश मोठ्या प्रमाणावर करण्यात आला. रशियन भाषेतील मूळ

हस्ताक्षरातील दैनंदिनी आज उपलब्ध नाही, परंतु मुख्य मुद्दा हा की, व्हेराने लिहिलेल्या मूळ रशियन भाषेतील मजकुराचे एच्.पी.बीं नी स्वतः इंग्रजीमध्ये भाषांतर केले. हे त्यांनी सिनेट यांना पुस्तक लिहिणे सुलभ होण्यासाठी केले, तरी ते त्यांच्या मनाविरूद्ध केले ही वस्तुस्थिती आहे. एच्.पी.बी. यांच्या स्वतःच्या हस्ताक्षरातील भाषांतर अड्यार येथील वस्तुसंग्रहालयात जतन केलेले आहे. त्यातील सुमारे अर्धा भाग सिनेट यांनी आपल्या पुस्तकात समाविष्ट केला असला तरी उरलेला भाग आजही अप्रकाशित असून त्यामध्ये अनेक गोष्टींवर प्रकाश टाकणाऱ्या, एच्.पी.बीं नी दिलेल्या तळटीपांचा समावेश आहे. त्या बहिणीने लिहिलेल्या मजकूराच्या स्पष्टीकरणासाठी आहेत. नंतरच्या काळात बोरीस डी. झिरकॉफ यांनी तत्कालिन अध्यक्ष श्रीराम यांचे परवानगीने त्या हस्तलिखिताची संपूर्ण मायक्रोफिल्म बनवून, अप्रकाशित मजकूराच्या प्रकाशनाची वाट मोकळी केली.

मास्टर एम् किंवा मौर्य हे त्यांचे प्राथमिक गुरू आणि एच्.पी.बी. ही त्यांची शिष्या. ह्या दोघांमधील संबंध सुरूवातीच्या काळात अस्पष्ट, अनिश्चित वाटत होते. १८५१ पर्यंत गुरूंबद्दलची अस्पष्ट जाणीव, क्षणिक दर्शन, भावनिक ओढ, संरक्षणात्मक मार्गदर्शन असे ह्या संबंधाचे स्वरूप होते. १८५१ मध्ये मात्र प्रथमच लंडनमध्ये त्यांना गुरूंचे सदेह दर्शन घडले. मास्टर मौर्य त्या काळात नेपाळच्या राजदूतावासाचे घटक होते. वेगळ्या नावाने ते उपस्थित होते आणि त्यांनी एच्.पी.बीं ना आपली ओळख पटवून दिली. लंडनच्या हाईड पार्कमध्ये त्यांची प्रत्यक्ष भेट झाली. बालपणापासून आत्तापर्यंत ज्यांना आपण मनोवैज्ञानिक पातळीवर भेटत होतो तेच हे अशी त्यांना ओळख पटली. १८५४ मध्ये पुन्हा एकदा इंग्लंडमध्ये प्रत्यक्ष सदेह भेट झाली परंतु १८६७-६८ च्या तिबेटमधील प्रत्यक्ष भेटीनंतरच त्यांच्या नात्यात शाश्वतता आणि भव्यता यांचा सुंदर मिलाफ झाला. मास्टर कुथुमी यांचेशी त्यांची भेट तुलनेने पुष्कळ उशिरा म्हणजे तिबेटच्या भेटीनंतर आली. सुरूवातीच्या काळात त्यांच्या आयुष्यात मास्टर कुथुमी यांची विशेष भूमिका नसावी. थिऑसॉफिकल सोसायटीच्या स्थापनेपूर्वीच्या दोन-तीन वर्षांच्या कालावधीत मात्र ह्या दोन्ही मास्टर्सच्या आणि अन्य महात्म्यांच्या भेटीघाटी ही नित्याची बाब होऊन गेली. बालवयापासून क्रमशः उत्तरोत्तर गुरूवर्यांशी जुळलेले संबंध अधिकाधिक दृढ होत गेले आणि अखेर सिद्ध संघाच्या लॉजमधून येणारे संदेश पोहोचविणारा

अधिकृत विश्वासू दूत अशी भूमिका त्यांनी निभावली.

१८५४ मध्ये मास्टर मौर्य यांची पुन्हा भेट झाली त्यावेळी ते नेपाळच्या राजदूतावासामध्ये नव्हते. त्यावेळी लंडनला जाणाऱ्या एका शिष्टमंडळामध्ये दुसऱ्या एका राजपुत्राच्या जागी त्यांना पाठविण्यात आले होते. गुरूवर्यांबरोबर झालेल्या एच्.पी.बीं. च्या ह्या दुसऱ्या भेटीचा वृत्तांत मेरी केनेफ यांनी लिहिला असून बोरीस के झिरकॉफ यांच्या फाईलमध्ये तो उपलब्ध आहे. १८६२ मध्ये सुवेझ कालव्यामार्गे पूर्वेकडे जाणाऱ्या पहिल्या तुकडीमध्ये त्या होत्या. हा त्यांच्या अध्यात्ममार्गावरील गूढ प्रशिक्षणाचा कालखंड होता. तिबेटमध्ये दीर्घकाळ एकाच ठिकाणी त्या कधीच राहिल्या नाहीत. १८६४ ते १८७२ च्या दरम्यान त्यांनी अनेक ठिकाणी वास्तव्य केले आणि यापैकी सुमारे सात वर्षे तिबेटमध्ये गेली. अध्यात्ममार्गावरील महत्त्वपूर्ण प्रशिक्षण त्यांना तेथेच मिळाले आणि त्यासाठी त्यांनी अत्यंत कडक साधना केली. त्यानंतरच थिऑसॉफिकल सोसायटीच्या स्थापनेचे अधिकृत कार्य करण्यास त्या पात्र ठरल्या. त्यांच्या तिबेट भेटीच्या संदर्भात थिऑसॉफिकल सूत्रांखेरीज माहितीचे अन्य स्रोत फारसे उपलब्ध नाहीत; म्हणजे Esoteric सोडल्यास ज्यास Exoteric म्हणता येईल अशी non-theosophical माहिती अपवादानेच आढळते. तिबेटच्या पायथ्याशी अत्यंत अनपेक्षित अशा ठिकाणी त्यांना भेटलेले दोन–तीन भारतीय एवढेच ते अपवाद. एका ब्रिटीश लष्करी अधिकाऱ्याने त्यांच्या तिबेट यात्रेचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला होता. हे त्या अधिकाऱ्याला भेटलेल्या अनेक व्यक्तींनी सत्य असल्याची खात्री दिली आहे. हा अधिकारी म्हणजे कर्नल मूरे, जो पुढे जनरल पदावर जाऊन पोहोचला.

मादाम एच्.पी.बी. यांचे हस्तलिखित साहित्य मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असले तरी त्यांनी स्वतः आपल्या तिबेटभेटीबद्दल काहीही नमूद केलेले नाही, त्यामुळे त्या तिबेटमध्ये जाऊन कशा पोहोचल्या, किती काळ त्या कुठे कुठे राहिल्या, कोणत्या परिस्थितीत त्यांनी तेथे वास्तव्य केले, महात्म्यांना कोणत्या परिस्थितीत राहताना त्यांनी पाहिले, तिबेटमधून त्या परत कशा बाहेर आल्या यासंबंधीची निश्चित माहिती उपलब्ध नाही. त्यांच्या लिखाणामध्ये आढळणारा एकमेव उल्लेख म्हणजे मास्टर कुथुमी यांच्या बहिणीच्या घरी काही काळ त्यांचे वास्तव्य होते. याच संदर्भात गुरूवर्यांच्या निवासस्थानी साफसफाई करणे आणि स्वच्छता ठेवणे इ. कामे पार पाडल्याचा उल्लेख आहे. त्याच काळात मास्टर

कुथुमी यांनी मठाधिपती लामांच्या अखत्यारीतील काही धार्मिक विधी पार पाडण्याची जबाबदारी स्वीकारली होती असे दिसते. बहुधा शिगात्से येथील मठाच्या कारभाराशी संलग्न अशा व्यवस्थापकीय कामातही त्यांचा सहभाग असावा. एच्.पी.बीं. वर सोपविलेले तिबेटमधील कार्य बहुधा गुप्ततेच्या शर्तीवर स्वीकारलेले अभियान असावे; त्यामुळे त्या संदर्भात मादाम एवढेच म्हणतात की, त्यांना भेटलेल्या एका व्यक्तीने गुरूवर्यांपर्यंत पोहोचण्यासाठी मार्गदर्शन केले. यापेक्षा जास्त विस्ताराने उघड करण्याची त्यांना परवानगी नसावी.

तिबेटची शेवटची सफर १८७१ मध्ये पूर्ण करून त्या युरोपला परत आल्या. युरोपमध्ये रूमानिया, ग्रीस आणि आज युगोस्लाव्हिया या नावाने परिचित असलेल्या प्रदेशास त्यांनी भेटी दिल्या. रशियाची हद्द ओलांडून तेथेही त्यांनी चंचूप्रवेश केला, परंतु तेथे जास्त काळ न थांबता काही दिवसातच त्या माघारी फिरल्या. युरोपमधील त्यांचा अखेरचा मुक्काम ग्रीसमध्ये होता. जुलै महिन्यात इजिप्तमधील अलेक्झांड्रियाला जाणाऱ्या स्टीमरवर त्या स्वार झाल्या. दुर्दैवाने ह्या स्टीमरवर बॉयलरचा स्फोट झाला आणि बोटीवरील सर्वजण समुद्रामध्ये फेकले गेले. त्यातील बहुसंख्य पाण्यात बुडून मृत्यूमुखी पडले. सुदैवाने एच्.पी.बी. ह्या जीवघेण्या संकटातून सहीसलामत वाचल्या. सोबतच्या सर्व चीजवस्तू गमावल्या, मात्र त्यांना प्रथम अलेक्झांड्रियाला आणि तेथून पुढे कैरोला पोहोचविण्यात आले.

इजिप्तमध्ये त्यांचे आगमन झाले, त्या भेटीत एका स्त्रीने त्यांना पुष्कळ सहाय्य केले. विवाहानंतर मादाम एमा कुलंब या नावाने थिऑसॉफिकल सोसायटीच्या इतिहासामध्ये त्या कुप्रसिद्ध ठरल्या; परंतु एच्.पी.बी. मात्र, त्यांनी इजिप्तमधील वास्तव्यात केलेली मदत लक्षात ठेऊन, अखेरपर्यंत त्यांच्याशी कृतज्ञ राहिल्या. कैरोमध्ये सुमारे सहा महिने त्यांचे वास्तव्य राहिले. या काळात अध्यात्मिक आणि गूढ घटनांचा खात्रीशीर माध्यमाच्या द्वारे शोध घेण्यासाठी त्यांनी एक सोसायटी स्थापन केली, परंतु हा खटाटोप व्यर्थ ठरला. गूढ मार्गाने अध्यात्मिक सत्ये उकलण्याचा हा प्रयत्न असफल ठरला.

त्यानंतर त्यांनी कैरोहून पॅरिसला प्रयाण केले. मादाम कुलंब ह्या काळात त्यांच्या आयुष्यातून तात्पुरत्या दूर गेल्या. वरवर पाहता त्यांची भेट तत्कालिक ठरली परंतु त्यामागे कोणतेतरी कार्मिक संबंध निश्चितच होते. १८७२ मध्ये त्यांच्या एका चुलत भावंडाबरोबर रहात असताना त्यांना लवकरच आपणास

अमेरिकेला जावे लागेल अशी कोणतीही कल्पना नव्हती. ह्या पार्श्वभूमीवर १८७३ मध्ये त्यांना त्यांच्या गुरूवर्यांकडून न्यूयॉर्क येथे स्थलांतर करण्याचे आदेश मिळाले आणि त्यांनी त्याचे पालन केले. त्यांच्यावर सोपविलेल्या महान कार्याची ही सुरूवात होती. ७ जुलै १८७३ रोजी त्या अमेरिकेत येऊन पोहोचल्या.

अमेरिकेत बोटीने जाण्यासाठी त्या चेरबोर्ग बंदरावर आल्या. आपल्या प्रवासासाठी त्यांनी प्रथमश्रेणीचे तिकीट खरेदी केले. त्याच बोटीने दुसरी एक महिला आपल्या लहान मुलासह जाणार होती. तिकीटे खरेदी करत असताना तिची फसवणूक झालेली होती. बहुधा तिच्या खऱ्या तिकीटांची चोरी झाली असावी व तिच्याकडे असलेली तिकीटे बहुधा खोटी असावीत. तिला त्या तिकिटांवर प्रवास करता येणार नाही हे एच्.पी.बीं च्या लक्षात येताच त्यांनी ताबडतोब आपले प्रथम श्रेणीचे तिकीट परत केले आणि त्याऐवजी अगदी निम्नस्तराची सर्वात स्वस्त अशी त्यांच्यासह ती महिला आणि तिचा मुलगा अशा तिघांसाठी तीन तिकीटे खरेदी केली. स्वतः कष्ट सोसूनही स्वार्थत्याग करून इतरांच्यासाठी आनंदाने पुढे येण्याची त्यांची नेहमीच तयारी असे त्याचे हे एक जिवंत उदाहरण.

न्यूयॉर्कला येऊन पोहोचल्यानंतर त्यांच्या खऱ्या कार्याला आरंभ झाला. जुलै १८७३ ते १८७४ अखेरपर्यंत त्यांनी अध्यात्मिक पत्रकारितेसाठी लेख लिहिले. ह्या दीड वर्षाच्या काळात एच्.पी.बीं नी अमेरिकेत अन्य कोणते कार्य केले यांची माहिती उपलब्ध नाही, परंतु नंतरच्या काळात उपलब्ध झालेली त्यांची काही पत्रे ह्या कालखंडातील त्यांच्या कामगिरीवर प्रकाश टाकणारी आहेत. रशियातील त्यांचे एक परममित्र दोंडुकॉव-कोर्सकॉव (राजपुत्र अलेक्झांडर एम् हे कॉकेशसमध्ये व्हॉईसरॉय होते. त्यांच्या कुटुंबियांचे ते फार जुने स्नेही होते. त्यांना लिहिलेल्या पत्रातून असे आढळते की, त्या पुन्हा एकदा अमेरिकेतून बाहेर पडल्या. सॅनफ्रान्सिसस्कोहून त्यांनी योकोहामास जाणारी बोट पकडली आणि त्या जपानला जाऊन पोहोचल्या. त्यावेळी मास्टर मौर्य तेथे रहात होते. त्याच मार्गाने नंतर त्या अमेरिकेत परत आल्या. १८७३-७४ च्या काळात आगबोटीच्या प्रवासात कित्येक महिन्यांचा कालावधी जात असे. ही सफर त्यांना मिळालेल्या आदेशानुसार पार पडली, परंतु योकोहामासमध्ये त्यांनी कोणते कार्य केले हे कोणालाही माहीत नाही.

१८७४ ची अखेर आणि १८७५ चा आरंभकाळ चित्तनदेन व्हरमॉट येथील एडी बंधूंच्या फार्महाऊसवर कर्नल हेन्री स्टील ऑलकॉट यांच्या गाठीभेटीमध्ये गेला. ह्या काळात निखळ अध्यात्मातील गूढ गोष्टींचा कर्नल ऑलकॉट यांना त्यांनी क्रमशः परिचय करून दिला आणि थिऑसॉफिकल सोसायटीच्या स्थापनेसाठी त्यांना तयार केले. याचा सविस्तर वृत्तांत जुन्या दिनदर्शिकेच्या पानातून (Old Diary Leaves) कर्नल ऑलकॉटनी स्वतःच दिलेला आहे.

थिऑसॉफिकल सोसायटीच्या आरंभकाळातील टीकाकारांची कर्नल ऑलकॉट यांचे सोसायटीच्या स्थापनेतील महत्त्वपूर्ण कार्य कमी लेखण्याची प्रवृत्ती दिसून येते. कर्नल ऑलकॉट यांचे महत्व कमी करणे किंवा त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे हे खरोखरच दुःखदायक आहे. हे केवळ वैयक्तिक दुःख नसून हे इतिहासाशी प्रतारणा करण्यासारखे आहे. ही घटना म्हणजे वस्तुस्थितीशी फारकत करणारी आणि अन्यायकारक आहे. सोसायटीच्या स्थापनेतील कर्नल ऑलकॉट आणि एच्.पी.बी. यांच्या भूमिका भिन्न असल्या तरी दोघांच्या कार्याचे मोल सारखेच आहे. कर्नल सोसायटीचे बाह्य संघटक होते तर एच्.पी.बी. गूढ अध्यात्मवादी आणि सिद्धसंघाच्या संदेशवाहक प्रतिनिधी होत्या. कर्नल ऑलकॉट मास्टर मौर्यांचे शिष्य असले तरी ह्या मार्गावर त्यांनी अलिकडेच वाटचालीस आरंभ केला होता आणि कित्येक वर्षांच्या धीम्या वाटचालीनंतरच त्यांना उच्च स्थान प्राप्त झाले. तुलनेने पाहता एच्.पी.बीं. ची मागील चार पूर्वजन्मांपासून अध्यात्ममार्गावर वाटचाल सुरू होती आणि त्यामुळे त्यांच्या कार्याचे स्वरूपही पुष्कळच भिन्न होते परंतु कर्नल ऑलकॉट बरोबर नसते तर थिऑसॉफिकल सोसायटी अस्तित्वात आली नसती. एच्.पी.बीं च्या बाबतीतही हे तेवढेच सत्य होते, कारण त्या नसत्या तर मास्टर्सना त्यांच्यासारखी दुसरी व्यक्ती शोधणे अन्यथा थिऑसॉफिकल सोसायटीची स्थापना लांबणीवर टाकणे असे पर्याय होते. कदाचित हा प्रयोग आणखी शंभर वर्षांनी पुढे ढकलावा लागला असता म्हणून याबाबतीत आपण दोघांना समान न्याय देणे आवश्यक आहे.

ज्याप्रमाणे कर्नल ऑलकॉट यांच्यामध्ये काही त्रुटी आणि वैगुण्ये होती, त्याचप्रमाणे एच्.पी.बी. यांच्यामध्येही काही उणिवा होत्या. ज्याच्यामध्ये कोणतीही कमतरता नाही अशी व्यक्ती सापडावी अशी केवळ आपण अपेक्षा करू शकतो. याबाबतीत मास्टर्सच्याही काही मर्यादा होत्या. ते सदासर्वकाळ

अचूक असतात असे नाही आणि आपण संपूर्णपणे परिपूर्ण असल्याचा दावा त्यांनी कधीही केलेला नाही. असे आहे तर मग इतरांच्या त्रुटी आणि उणिवा शोधत राहण्यापेक्षा त्यांच्यापैकी ज्यांनी काही भव्यदिव्य कामगिरी केली आहे त्यावरच आपण भर का देवू नये? मास्टर्सच्या कार्यपूर्तीसाठी कर्नल ऑलकॉट यांच्याएवढेच प्रचंड कार्य थि. सोसायटीच्या स्थापनेपासून आतापर्यंतच्या इतिहासामध्ये ज्यांनी केले आहे अशी एकतरी व्यक्ती सापडली तर ती आनंदाची गोष्ट ठरेल. कर्नल ऑलकॉट यांचेकडे दुर्लक्ष करणे किंवा त्यांच्या कार्याचे अवमूल्यन करणे म्हणजे हा उद्योग करणाऱ्यांच्या मनाचा केवळ कोतेपणा दाखविणारे लक्षण आहे. तसेच त्यांच्या कार्याचे केवळ कोडकौतुक करणे आणि त्याला अवास्तव प्रकाशझोतात आणणे पक्षपाती वृत्तीचे ठरेल.

कर्नल ऑलकॉट यांनी चुका केल्या असतील, त्यातील काही आपण जाणतो, परंतु त्यामागील कारणे आपणास माहीत नाहीत. त्यांचीही परीक्षा घेतली जात होती. त्यांच्या स्वतःच्या कसोट्यांना त्यांना उतरायचे होते आणि त्यासाठी कष्ट आणि यातना सोसाव्या लागल्या. त्यातून पार पडताना चुका टाळणे सोपे नव्हते; त्यामुळे टीकाकारांची त्यांच्याकडे पाहण्याची त्या काळात जी दृष्टी होती आणि आजही क्वचित जी दिसून येते, ती थिऑसॉफिकल चळवळीमध्ये कर्नलना मागे सारणारी असून इतिहासाला न्याय देणारी नाही.

थिऑसॉफिकल सोसायटीच्या स्थापनेपासून 'आयसिस अनव्हेल्ड' (Isis Unveiled) च्या लेखनाची सुरूवात झाली. १८७४ ची अखेर आणि १८७५ ची ती सुरूवात होती आणि १८७७ ला पुस्तकाचे प्रकाशन झाले. 'सिक्रेट डॉक्ट्रीन' (The Secret Doctrine) हा दुसरा ग्रंथ – त्याचे लेखन पुष्कळ उशिरा सुरू झाले आणि पुस्तक पूर्ण व्हायला अनेक वर्षे लागली. तरीसुद्धा ह्या दोन्ही पुस्तकांचा विचार एकत्रितपणे करणे संयुक्तिक ठरेल. एक साहित्यिक निर्मिती ह्या दृष्टीने पाहिल्यास दोन्ही पुस्तकांची निर्मितीप्रक्रिया विलक्षण आहे. अनेक ग्रंथ, पुस्तके, नियतकालिके, वृत्तपत्रे आणि जर्नल्स यांचा आधार घेऊन त्यामधील वचने उद्‌धृत करून (परंतु प्रत्यक्ष त्यांचे अवलोकन न करता किंवा ती न हाताळता) ह्या दोन्ही ग्रंथांचे लेखन पूर्ण झाले. ह्या संदर्भातील त्यांचे एकमेव स्पष्टीकरण पुरेसे आहे, जे त्यांनी स्वतःच अनेक ठिकाणी दिले आहे; ते असे की त्यांनी नमूद केलेले संदर्भांकीत ग्रंथ किंवा त्यातील उद्‌धृत केलेली वचने किंवा परिच्छेद त्यांनी दिव्य प्रकाशात (Astral Light) पाहिले/

वाचले. त्यातील बहुतेक त्या स्वतः वाचू शकल्या अन्यथा त्यांच्या दृष्टीसमोर दृष्यमान होण्यासाठी त्यांना पाचारण करावे लागले. वेगळ्या शब्दात सांगायचे तर आकाशिक नोंदी तपासण्यास त्यांची अंतर्दृष्टी ही मर्यादित होती. तथापि त्यांच्या गुरूवर्यांकडून त्यांना फार मोठ्या प्रमाणावर मदत होत होती; तसेच अनेक सभासदांनी बाहेरून संदर्भ पुरवून मोठी मदत केली तरी एकूण कार्याचा व्याप लक्षात घेता ही बाह्य मदत अगदी नगण्य होती. अंतर्दृष्टीने अनेक ग्रंथ अवलोकन करणे जर एच्.पी.बीं. ना शक्य झाले नसते तर वरील दोन्हीपैकी एकही ग्रंथ इतक्या अल्पावधीमध्ये पूर्ण झाला नसता.

'आयसिस अनव्हेल्ड' हा ग्रंथ रातोरात सर्वाधिक खपाचा वाचकप्रिय ग्रंथ ठरला. पहिल्या आवृत्तीच्या १००० प्रति काही आठवड्यामध्येच संपून गेल्या. हे असामान्य कार्य होते आणि त्याचा खूप व्यापक परिणाम झाला. नंतरच्या आवृत्तींनासुद्धा फार वेगाने प्रतिसाद मिळाला; विशेषतः जगाच्या काही भागातून आणि काही जनसमुदायाकडून मिळालेला प्रतिसाद विलक्षण होता.

थिऑसॉफिकल सोसायटीची स्थापना न्यूयॉर्कमध्ये झाली तरी संस्थापकांचे वास्तव्य न्यूयॉर्कमध्ये क्वचितच असे. एच्.पी.बी. आणि ऑलकॉट दोघेही सुरूवातीला सोसायटीचे प्रतिनिधी या नात्याने भारतामध्ये आले आणि कालांतराने त्यांचे भारतातील वास्तव्य कायमस्वरूपी झाले आणि न्यूयॉर्कमधील लॉजचे कार्य थांबले. तरीसुद्धा दीर्घकाळपर्यंत त्याचा उल्लेख मातृसंस्था (Parent body) म्हणून होत असे आणि तेथूनच डिप्लोमा पाठविले जात असत; परंतु नंतर घटनेतील तरतुदीनुसार जेथे संस्थापक असतील तेथेच मुख्यालयाचे ठिकाण निश्चित झाले आणि अशा प्रकारे सोसायटीच्या मुख्यालयाचे भारतात स्थानांतर झाले. हे सर्व अड्यारची स्थापना होण्यापूर्वीच घडून आले होते.

भारतातील स्थानांतर तसेच त्यानंतर एच्.पी.बीं. चे लंडनमध्ये वास्तव्य ह्या अचानक घडलेल्या घटना नाहीत. काळजीपूर्वक पाहिले तर त्यामध्येसुद्धा थिऑसॉफिकल चळवळीच्या दृष्टीने केलेले ऐतिहासिक नियोजन असावे. सुरूवातीला अमेरिका नंतर भारत आणि युरोप अशा रीतीने अध्यात्मिक शक्तिस्रोताची केंद्रे निर्माण करण्याची सूत्रबद्ध योजना त्यात असावी. एच्.पी.बी. ह्या त्या शक्तिस्रोताच्या संदेशवाहक दूत – प्रतिनिधी होत्या आणि त्यादृष्टीने वरील तिन्ही ठिकाणी त्यांचे वास्तव्य अनिवार्य होते.

कर्नल ऑलकॉट यांच्या लिखाणावरून एच्.पी.बीं. च्या जीवनातील अनेक चमत्कृतीजन्य प्रसंग-घटना, त्यांनी केलेले चमत्कार यांची माहिती उपलब्ध आहे.

परंतु त्याखेरीज भारत, अमेरिका आणि युरोपमधील कितीतरी लोकांनी ते प्रत्यक्ष पाहिले असून त्या संबंधीच्या आठवणी मागे ठेवल्या आहेत. एच्.पी.बीं.चे एक महान सहकारी आणि तीन संस्थापकांपैकी एक श्री. विल्यम क्यू. जज यांनी शब्दबद्ध केलेले सविस्तर वृत्तांत उपलब्ध आहेत. त्याकाळी वारंवार घडणाऱ्या चमत्कृतीजन्य घटनांचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आणि त्यांनी मागे ठेवलेल्या आठवणी, वृत्तपत्रातून प्रसिद्ध झालेले लेख विचारात घेतले तर लक्षात येते की ह्या घटना केवळ मूठभर लोकांपुरत्या मर्यादित नव्हत्या. ज्यांनी त्या प्रत्यक्ष अनुभवल्या आणि त्यांची शहानिशा करून घेतली. योगसाधनेने प्राप्त होणाऱ्या अनेक सिद्धी एच्.पी.बीं ना प्राप्त होत्या आणि त्यास मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी – कदाचित प्रमाणाबाहेर – प्रसिद्धी लाभली. प्रसिद्धीने वलयांकित अशा ह्या नेत्रदिपक घटनांमागील तत्त्वज्ञानाकडे त्यामुळे पुरेसे लक्ष दिले गेले नाही असे वाटते. ह्या घटनांच्या माध्यमातून व्यक्त होणारे मानसिक आणि अध्यात्मिक दृष्टीकोन आणि संबंधीत व्यक्तींचे चरित्र यांच्या अनुषंगाने ह्या घटनांकडे पाहिले पाहिजे – मग ते सीलबंद पत्रांचे वाचन असो किंवा जगाच्या विविध भागात होणारे जाणिवेचे संक्रमण असो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे वस्तूंची प्रत्यक्ष निर्मिती किंवा प्रकटीकरण. अनेकदा हवेतून कागद प्रकट होणे, त्यावर लेखी मजकूर उमटणे हे प्रकार वारंवार घडले. केवळ हवेच्या पोकळीतून कोणत्याही वाद्याच्या मदतीशिवाय संगीताची निर्मिती यासारख्या विस्मयजनक प्रकारांची उपपत्ती किंवा स्पष्टीकरण देणे अल्पावधीत सोपे नव्हते आणि बहुधा शक्यही नव्हते. मात्र असे प्रसंग वारंवार घडले आणि त्यांची नोंद अनेक ठिकाणी आढळते. त्यांनी त्याचे स्पष्टीकरण करताना एवढेच सांगितले की ''मानवाच्या ठिकाणी सुप्त असलेल्या शक्तिप्रवाहांचा हा केवळ वानगीदाखल केलेला जागृत अविष्कार आहे.''

एच्.पी.बी. ह्या महान गुरूजनांच्या संदेशवाहक दूत होत्या आणि ठराविक कालांतराने उद्‌भवणाऱ्या कसोटीच्या क्षणी त्यांचा संदेश देण्यासाठी तो अवतरला होता. ही गोष्ट वारंवार अधोरेखित करणे अनिवार्य आहे. एवढ्या अध्यात्मविद्येचे बीज जनमानसामध्ये रूजविणे आणि त्याच्या तत्त्वज्ञानाची पायाभरणी करणे हे त्याचे जीवनकार्य होते हे विसरून चालणार नाही. चमत्कार हे चमत्कार असतात आणि त्यांचे महत्त्व प्रासंगिक असते. जगाला ज्याची खरी गरज आहे अशी अध्यात्मविद्येची मूलतत्त्वे त्यांच्या कार्यातून लोकांना युगायुगांसाठी प्राप्त झाली हे महत्त्वाचे आहे कारण हाच भविष्यकालीन नव्या मानवी संस्कृतीचा पाया आहे.

★★★

# थिऑसॉफिस्टची कर्तव्ये

१. सामान्य सभासद म्हणूनसुद्धा व लॉजमधे पदाधिकारी असलास तर अधिकच जबाबदारी येते. तू स्वतः शिकावेस (थिऑसॉफीचे अध्ययन करून) म्हणजे इतरांना शिकवू शकशील; आध्यात्मिक ज्ञान व सामर्थ्य संपादन कर ज्यामुळे थिऑसॉफीविषयक व लॉजचा कार्यभार स्वतःच्या शिरावर घेऊ शकशील व अज्ञानाला बळी पडून दुःख भोगणाऱ्यांना तुझ्याकडून त्यांच्या दुःखाचे कारण व त्यावरील उपाय कळेल.

– महात्मा कुथूमी

1. You should even as a simple member, much more as an officer, learn that you may teach, acquire spiritual knowledge and strength that the work may lean upon you, and the sorrowing victims of ignorance learn from you the cause and remedy of their pain.

- Master K. H.

२. तुला वाटणारी सहानुभूति वाढत जावो. हिचा संकोच होवू देवू नको. वाढव. तुझ्याबरोबरच्या व्यक्तींबरोबर ऐक्य अनुभवण्याचा प्रयत्न कर. तुझ्या सख्या–सोबत्यांचे वर्तुळ संकुचित करू नकोस.

– महात्मा कुथूमी

2. Broaden instead of narrowing your sympathies: try to identify yourself with your fellows, rather than to contract your circle of affinity.

- Master K. H.

# दामोदर आणि थिऑसॉफिकल चळवळ

**प्रेषक – नितीन अभ्यंकर, पूना लॉज.**

**(मी पूना लॉजमध्ये जुलै २०१९ पासून महिन्यातून एकदा या विषयावर बोलत आहे. तेच व्याख्यान येथे क्रमशः देत आहे.)**

मी या जन्मात दामोदर आहे आणि पुढच्या जन्मात आणखी कोणी. माझा देहात्मा (Personality) या जन्मानंतर नष्ट होणार आहे, दामोदर नष्ट होणार आहे, पुढच्या जन्मी नवा देहात्मा असणार आहे पण माझा जीवात्मा (Individuality) हा प्रत्येक जन्मात वेगवेगळा नसतो. तो प्रत्येक जन्मानंतर नाश पावत नाही तर तो जन्म-मृत्युच्या चक्रात टिकून रहातो. माझ्या जीवात्म्याचे हे वेगळे अस्तित्व माझ्या जीवात्म्याने निर्वाण प्राप्त करेपर्यंत वेगळे राखणे आवश्यक आहे. ही सगळी प्रक्रिया अध्यात्मशास्त्रात सांगितली, शिकवली जाते.

मी काही शून्यातून nothing मधून तयार झालेलो नाही. ज्या कणांनी मी बनलो ते कण आधीपासूनच अस्तित्वात आहेत; पण मला माहित नाही की ते आधी कोणत्या रूपात आणि कोठे अस्तित्वात होते. ह्या कणांची आधी लक्ष, दशलक्ष रूपांतरणे झाली असतील पण हे सर्व दामोदरला माहित नाही कारण मी दामोदर किंवा माझा देहात्मा प्रदीर्घ जन्मसाखळीत राखून ठेवलेला नाही. माझ्या देहात्म्याचे विघटन थांबवेल असे बल मी वापरले नाही. हे कसे करायचे याची किल्ली अध्यात्मशास्त्र देते. जर अध्यात्माशास्त्राच्या सूत्रांप्रमाणे मी कृत्या केल्या तर मी निर्वाणाला पोहोचेन.

मी जरी निर्वाणात पोचलो तरी ती विलिनीकरणाची अवस्था शाश्वत नसते. त्या अवस्थेत मी कायम रहात नाही. निर्वाण हे शाश्वत, सुसंगत नाही. काही वर्षांच्या किंवा काही जन्मांच्या (जे मर्यादित आहेत) कृतींमुळे मला अमर्याद बक्षीस किंवा शिक्षा मिळेल हे शक्य नाही. दशलक्ष वर्षेसुद्धा शाश्वतापुढे, अमर्याद कालावधीपुढे काहीच नाहीत. कोणत्याही मर्यादितचे फळ अमर्याद मिळणे हे न्याय्य नाही, उचितही नाही.

आता तू विचारशील की निर्वाणावस्थेस जाऊन जर परत यायचे असेल तर निर्वाण प्राप्त करण्याचा उपयोग तरी काय? याची पुन्हा दोन कारणे

आहेत. पहिले म्हणजे मी निर्वाणात काही काळ असेन. कोणताही परिणाम हा कारणांच्या प्रमाणात असतो. मी वापरलेल्या बलांचा परिणाम जोपर्यंत कार्यरत आहे तोपर्यंत मी निर्वाणात असेन. निर्वाणात पोचण्यासाठी मी केलेल्या प्रयत्नांचे परिणाम पूर्ण होईपर्यंत मी निर्वाणात असेन, नंतर नाही. आता तू विचारशील की ही कारणे तयार करण्याची आणि त्याचा परिणामस्वरूप निर्वाणावस्था ही प्रक्रिया मी अनंत काळासाठी ad infinitum करू शकतो का? तर उत्तर निश्चित आहे की हे शक्य नाही. कारण Law of Exhaustion सदैव कार्यरत असतो. आपण विशिष्ठ परिणाम साध्य करण्यासाठी काही उर्जा खर्च करतो. जेव्हा दुसरे काही तरी कमी होते (detriment), खर्च होते, तेव्हाच तुझ्याकडून काहीतरी कृती होते.

दुसरे कारण असे आहे की जेव्हा तू या सूक्ष्मीकरणाच्या प्रक्रियेतून जात असतोस तेव्हा तू ज्या कणांचा बनला आहेस त्या कणांमध्ये काही विशिष्ठ, निश्चित प्रवृत्ती तयार होतात. या विश्वात जी एका पाठोपाठ सायकल्स् येत असतात त्या सर्व चक्रात कणांच्या अशा तयार झालेल्या प्रवृत्ती परत परत व्यक्त, दृगोचर होत रहातात. सोप्या भाषेत सांगायचे तर रूपांतरणाच्या या चक्रात, पुर्नजन्माच्या साखळीत एक पोषक, पूरक स्थिती तयार होते जी तुला निर्वाणावस्थेस लवकर पोचण्यासाठी सहाय्यकारी, लाभदायी ठरते. यामुळे तू थोडा जास्त काळ निर्वाणावस्थेत राहू शकतोस, तुलनेने तू थोडा जास्त काळ मुक्त असतोस.

माणसाची जाणीव पूर्ण विकसित झाल्यानंतर जर जीवात्म्याने ती निर्वाणाला पोचेपर्यंत पावित्र्याने अबाधित राखली नाही तर त्या जाणिवेचे पूर्ण विकासाच्या अवस्थेतून विघटन हे होणारच. मी हे मानतो की दामोदर म्हणून माझ्या जाणीवेचा पूर्ण विकास हा या पृथ्वीवरच शक्य आहे. त्यामुळे जर मी त्याआधीच मृत्यू पावलो तर माझ्या जीवात्म्याला पृथ्वीवर परत जन्म घेणे क्रमप्राप्त आहे.

तुला आत्तापर्यंत सांगितलेली पुर्नजन्माबाबतची माहिती तुझ्यासाठी पुरेशी आहे. या सर्व संकल्पना कागदावर उतरवणे खूप अवघड आहे कारण ही प्रक्रिया क्लिष्ट आहे. अशा गोष्टी आणि संकल्पना अंतःप्रज्ञेनेच जाणून घ्यायच्या असतात. या सर्व संकल्पना दुसऱ्याला सांगण्यासाठी प्रथम माझ्या अमूर्त विचारांना मूर्त रूप द्यावे लागते. ते क्रमवार, मुद्देसूद मांडावे लागते आणि मगच

ते लिहून काढता येते. त्यामुळे या संकल्पनांवर लिहिण्यापेक्षा किंवा बोलण्यापेक्षा समोरासमोर चर्चा करणे मला जास्त सोपे वाटते. तुला हे सर्व लिहिताना अनेक मुद्दे माझ्याकडून सुटले असतील पण मी तुला मुख्य संकल्पना दिल्या आहेत. यावर तू प्रश्न विचारू शकतोस आणि त्याची उत्तरे द्यायला मला नक्कीच आवडेल. यात ज्या काही त्रुटी आहेत त्याला फक्त मीच सर्वस्वी जबाबदार आहे. मी फक्त Isis Unveiled वाचले आहे. एच्.पी.बीं. ना बोलताना बरेच वेळा ऐकले आहे आणि काही प्रसंगी उच्च शक्तींकडून, दिक्षितांकडून काही सूचना, निर्देश मिळाले आहेत; पण पुढची समजून घेण्याची प्रक्रिया व प्रयत्न माझेच आहेत. जर हे सर्व तुला योग्य आणि बरोबर वाटले तर त्याचे सर्व श्रेय एच्.पी.बी. आणि आपल्या ज्येष्ठ बंधूंना जाते. उलट जर काही चुका असतील तर नीट समजून न घेण्याचा पूर्ण दोष माझा आहे आणि यातून हेच निदर्शनास येईल की मी अंतःप्रज्ञेच्या क्षेत्रात खूप मागे आहे.

यानंतर २७/१०/१८८१ रोजी, ८/५/१८८२ रोजी आणि ११/६/१८८३ रोजी जज कारूपानोर, व्हेनिझुईला, द. अमेरिका येथून दामोदरला तीन पत्रे लिहितात. या आधीच्या पत्रांतील सूर या तीनही पत्रातून आपणास दिसून येतो.

पहिल्या पत्रात जज लिहितात, डोंगराच्या एका कड्याजवळील विचित्र अशा जागेतून मी तुला पत्र लिहित आहे. निसर्ग आणि आजुबाजूला काही थोडे लोक याशिवाय येथे काहीही नाही. माझा आचारी बनारसचा आहे पण तो भ्रष्ट आहे कारण तो डुकराचे मांस खातो आणि दारू पितो. मी इथे काही थिऑसॉफिकल उद्देशाने आलेलो नाही तर पैसे मिळवण्यासाठी आलेलो आहे. येथे चांदीची खाण विकसित करण्यासाठी आलेलो आहे. मी श्रीमंत होणार की नाही हे अल्पावधीतच कळेल. महात्मे मला मदत करतील का नाही ते माहित नाही पण माझा विश्वास आहे की ते माझ्यावर लक्ष ठेवून आहेत. न्यूयॉर्क सोडल्यापासून तुझे पत्र नाही. तू ठीक असशीलच. एच.एस.ओ. व एच्.पी.बी. यांना माझे प्रेम पोहोचव.

दुसऱ्या पत्रात जज लिहीतात, मी भगवद्‌गीता व त्यातले कृष्ण, अर्जुन संवाद वाचले. यातून आणि तुझ्या आधीच्या दीर्घ पत्रातून ‘सत्याची दिशा कोणती’ ते मला आता मला निश्चित कळले आहे. याशिवाय त्यावेळच्या अमेरिकेतील थिऑसॉफीसंबंधित काही घडामोडींबाबत काही गोष्टी ते

लिहितात. एच.एस.ओ. यांचे कार्य अतुलनीय आहे आणि त्याचे अनेक चांगले परिणाम भारत व अमेरिकेत दोन्ही ठिकाणी घडले आहेत. अमेरिकेत बुद्धीझमबद्दलचा रस वाढत आहे आणि लवकरच न्युयॉर्क येथे या संदर्भात एखादा मेळावा भरेल अशी मला आशा आहे. तू कामात खूप व्यस्त आहेस याची मला कल्पना आहे. मी येथे खाणीतून पैसे कमवायच्या मागे आहे आणि खूप कष्ट घेत आहे. लवकरच मी यातून मोकळा होईन असा माझा प्रामाणिक विश्वास आहे. माझे ॲस्ट्रॉलॉजी, ज्योतिषशास्त्रासंबंधित लेख तुम्हाला छापण्यायोग्य वाटले म्हणून मी समाधानी आहे. मला पाठवण्यासाठी तुझ्याकडे तुझा एकही फोटो नाही याचे मला वाईट वाटते. खात्री बाळग की मी तुझा प्रिय मित्र आहे आणि तुझा, गौतम बुद्धांच्या तत्त्वज्ञानाचा आणि .. (३ डॉटस्) चा सेवक आहे.

तिसऱ्या पत्रात जज लिहितात, मला तुझे पत्र मिळाले. त्याच्या मागच्या बाजूस लिहीले आहे की ("Better come M .. (३ डॉटस्)"). मला तुझे गुरू कोण आहेत ते माहीत नाही पण ते M .. (३ डॉटस्) असावेत. (दामोदरचे गुरू महात्मा के.एच्. आहेत तर एच.एस.ओ. व एच्.पी.बी. यांचे गुरू महात्मा एम्. आहेत.) एच.एस.ओ. यांनी पण मला अड्यारला येण्याची खूप विनंती केली. या सर्व विनंत्यांनी मला बांधून टाकले आहे. येथे रहाणे किंवा अड्यारला येणे हे दोन्ही निर्णय माझ्यासाठी मोठ्या कसोटीचे क्षण आहेत. येथे रहाण्याचा निर्णय हा जास्त कसोटीचा क्षण आहे कारण येथे घरगुती नातेसंबंधात सर्व काही आलबेल नाही. अड्यारला उड्डाण करण्यासाठी मी जीव ओवाळून टाकायलाही तयार आहे पण असे अड्यारला येणे योग्य होणार नाही. त्यामुळे मी अड्यारला येऊ शकत नाही. न्यायाने वागण्याची गरज महात्म्यांनी माझ्यापुढे अनेकदा मांडली आहे आणि ती भूमिकाही सोडू शकत नाही. माझ्यासाठी जे जीवन योजले आहे ते जरी सुखावह नसले तरी ते सुखावह मानणे हेच योग्य आहे. मला कष्टाची भिती नाही आणि कितीही कष्ट करायला मी तयार आहे. (या पत्रात जरी जज यांनी अड्यारला जाण्याची असमर्थतता व्यक्त केली असली तरी प्रत्यक्षात ते जुलै १८८४ ला भारतात अड्यारला आले होते आणि ऑक्टोबर १८८४ च्या अखेर पर्यंत अड्यारला होते पण अनेक घरगुती कारणांमुळे ते या भेटीच्या संधीचा पूर्ण लाभ घेऊ शकले नाहीत.) (क्रमशः)

## कोणाला काय पटते?

आपली मते लोकांच्या माथी मारण्याची प्रत्येक उत्साही माणसाला खोड असते. पण जी गोष्ट माणसाला अंतर्यामी अगोदरच माहीत आहे – मात्र ती त्याच्या मेंदूत अद्यापि उतरलेली नाही आणि म्हणून ती त्याला स्वतःसमोर व्यक्त करता येत नाही – तीच गोष्ट तो दुसऱ्यापासून आनंदाने ग्रहण करू शकेल. जो माणूस अगोदरच ह्या पायरीपर्यंत येऊन पोहोचलेला नसेल त्याला लोकांनी सांगितलेला सिद्धांत ग्रहण करणे साधणार नाही आणि जर तो सत्यसिद्धांत बळजबरीने त्याच्यावर लादण्याचा कोणी प्रयत्न केला तर फायद्यापेक्षा तोटाच अधिक होईल.

**– ॲनी बेझंट**

## Ponder Over It

For within you is the light of the world -- the only light that can be shed upon the Path. If you are unable to perceive it within you, it is useless to look for it elsewhere. It is beyond you; because when you reach it you have lost yourself. It is unattainable, because it forever recedes. You will enter the light, but you will never touch the flame.

**--- Light on the Path**

The Theosophical idea of charity means *personal* exertion for others; *personal* mercy and kindness; personal interest in the welfare of those who suffer; personal sympathy, forethought and assistance in their troubles or needs. We Theosophists do not believe in giving money (if we had it) through other people's hands or organizations. We believe in giving to the money a thousandfold greater power and effectiveness by our personal contact and sympathy with those who need it. We believe in relieving the starvation of the soul, as much if not more than the emptiness of the stomach; for gratitude does more good to the man who feels it, than to him for whom it is felt.

**--- H. P. B., Key To Theosophy**

## लॉज वार्ता

**मे व जून २०२० मधील म. थि. फे. स्तरावरच्या कोणत्याही सभा, चर्चासत्रे, कार्यशाळा किंवा इतर कोणतेही कार्यक्रम कोविड–१९ च्या प्रार्दुभावामुळे झाले नाहीत. तसेच भोवाली येथे यावर्षी होणारी सर्व चर्चासत्रे, कार्यशाळा व बैठका रद्द करण्यात आल्या आहेत.**

◆ **म. थि. फे. कार्यकर्ता वृत्तांत –**

१) रविवार १२ जुलै २०२० रोजी दुपारी १२ वाजता म. थि. फे. ची कार्यकारिणीची सभा झूम वर घेण्यात आली. या सभेला ११ सदस्य उपस्थित होते. झूम वापराच्या संदर्भात एक रंगीत तालीम सभा रविवार ५ जुलै २०२० रोजी घेण्यात आली.

◆ **दी अकोला लॉज, अकोला –**

म. थि. फे. चे माजी सचिव व अकोला लॉजचे सभासद बंधु प्रा. डॉ. अशोक सोनोने (Librarian & HOD, Dept. of Library Science), सिताबाई आर्टस् कॉमर्स सायन्स कॉलेज, अकोला येथे कार्यरत व उच्चशिक्षा– विभुषित, यांचे जगद्गुरू संत तुकाराम यांच्यावरील '**संत तुकारामांचे सामाजिक प्रबोधन**' हे पुस्तक नुकतेच साईज्योती प्रकाशन, नागपूर येथून प्रकाशित झाले आहे. सामाजिक समरसता, बंधुता, रूढी, परंपरा, बुवाबाजी, वैज्ञानिक दृष्टिकोन, संतांची विश्वबंधुत्वाची शिकवण, साधकांसाठी आवश्यक पात्रता आदी विषय संत तुकाराम महाराज यांच्या अभंगांच्या सहाय्याने या ग्रंथात हाताळले आहेत. लेखकाच्या गत ३५ वर्षातील गाथेच्या व इतर आध्यात्मिक ग्रंथांच्या अध्ययनाची फलश्रुती म्हणजे हा ग्रंथ होय. या ग्रंथलेखनाला ज्येष्ठ थिऑसॉफीस्ट स्व. दादासाहेब वालचले, ज्येष्ठ सभासद बंधु शंकरराव कदम यांची प्रेरणा असल्याचे लेखकाने व्यक्त केले आहे. बंधु अशोक सोनोने यांचे दुसरे पुस्तक **'Use of LMS in Library Automation'** Saraswat Publications, Bilaspur द्वारा प्रकाशित होत आहे.

◆ **दी डोंबिवली लॉज, डोंबिवली –**

१) डोंबिवली लॉजचे सक्रीय सदस्य सभासद व लॉजचे अध्यक्ष बंधु विनय ठाकूर आणि लॉजच्या सर्व सभासदांच्या सहकार्याने कोरोना विषाणूबाधित

वातावरणात लॉजच्या सर्व सभासदांसाठी ऑनलाईन व्हिडिओ कॉन्फरन्स आयोजित करून विविध विषयांवर भाष्य आयोजित करून थिऑसॉफीच्या साहित्यिक ज्ञानाची ओळख सर्व सभासदांना झाली. या कामी सहभागी झालेल्या सर्व वक्त्यांची नावे व विषय -

अ) **व्याख्यान विषय** - १) महान सत्य २) सत्यम् शिवम् सुंदरम - २ भाग ३) मृत्यू (Death) ४) मरणोत्तर स्थिती - ३ भाग ५) विचारसामर्थ्य (Thought Power) - २ भाग ६) विचारांचे उन्नयन ७) थिऑसॉफीच्या अभ्यासाचा उपयोग - २ भाग ८) करूणामैत्री - अंतःप्रज्ञा ९) मुदिता - उपेक्षा - अंतःप्रज्ञा.

**बंधु अशोक लोखंडे** यांनी दि. २०-०४-२०२० ते १८-०७-२०२० या कालावधीत एकूण १५ व्याख्यानांची मालिका डोंबिवली लॉजच्या सभासदांसाठी सादर केली.

ब) वक्ते - **बंधु सुधिंद्र सरनोबत,** डोंबिवली

**व्याख्यान विषय** - १) ज्ञान - प्रकार व उपयोग २) देव-देवता आणि त्यांचे कार्य ३) आधुनिक अनुभूती ४) आध्यात्मिक समपर्ण ५) तिथी आणि त्यांचे महत्व - २ भाग ६) कर्मयोग ७) अध्यात्म आणि व्यवसाय/नोकरी असे एकूण ७ व्याख्याने दिली.

क) वक्ते - **बंधु डॉ. अशोक सोनोने,** अकोला.

**व्याख्यान विषय** - साधनचतुष्ट्य (अ‍ॅट दि फीट ऑफ दि मास्टर - जे. कृष्णमूर्ती लिखित) या पुस्तकातील विवेक, वैराग्य, सदाचार आणि भक्ती या विषयावर सलग ४ दिवस अभ्यास वर्ग घेतला.

**सर्व वक्त्यांचे म. थि. फे. तर्फे आभार, अभिनंदन आणि धन्यवाद!**

२) डोंबिवली लॉजचे उपाध्यक्ष व उस्फुर्त जेष्ठ कार्यकर्ता बंधु जितेंद्र ठाकूर यांनी अथक प्रयासाने स्वलिखित 'संपूर्ण सुलभ महाभारत' हा ग्रंथ १८ पर्वांचा व ९३२ पृष्ठांचा ग्रंथराज बुधवार दि. २४ जून २०२० रोजी 'धार्मिक प्रकाशन संस्था' गिरगाव, यांनी मुंबई येथून प्रकाशित केला. बंधु जितेंद्र ठाकूर यांच्या या कार्याचे म. थि. फे. च्या सर्व सभासदांकडून हार्दिक अभिनंदन आणि शुभेच्छा!

◆ **दी धंतोली लॉज, नागपूर** –

नागपूरला धंतोली लॉजचे जेष्ठ विचारवंत, अभ्यासू सदस्य बंधु वसंतराव धारस्कर यांनी कोरोना कोविड १९ च्या दुषित वातावरणामुळे त्रस्त अशा काळात थिऑसॉफीतील सभासदांना अभ्यासास प्रवृत्त करण्यासाठी एक छान उपक्रम सुरू केला. जागतिक विचारवंत जे. कृष्णमुर्ती लिखित "Freedom from the Known" या पुस्तकातील एक एक परिच्छेद टाईप करून त्याचे अभ्यासपूर्वक मराठी भाषांतर करून व सभासदांना अभ्यासपूर्वक विचार करता यावा म्हणून नित्यदिनी थिऑसॉफीशी संलग्न व्हॉटस्ॲप ग्रुपवर एक एक परिच्छेद प्रसारीत करून कित्येक सभासदांना दररोज अभ्यासास प्रवृत्त केले. **त्यांच्या या उपक्रमास म. थि. फे. तील सर्व सभासदांतर्फे बंधु धारस्कर यांच्यावर कौतुकाची थाप, अभिनंदन, हार्दिक शुभेच्छा आणि धन्यवाद!**

◆ **दी पूना लॉज, पुणे** –

१) पूना लॉजमध्ये १५ मार्च २०२० पर्यंतचे रविवारचे कार्यक्रम नेहमीप्रमाणे संपन्न झाले. मंगळवार दि. १७ मार्च २०२० रोजी साप्ताहिक अभ्यास वर्ग नेहमीप्रमाणे झाला. त्यानंतर रविवार दि. २६ जुलै २०२० पर्यंत पूना लॉजमधे कोवेड–१९ च्या प्रार्दुभावामुळे कोणतेही कार्यक्रम झाले नाहीत. **याला अपवाद भारत समाज पूजेचा.** लॉजमधे १९२८ पासून नेमाने दर रविवारी भारत समाज पूजा न चुकता घेण्यात येते. भगिनी सुमती कुलकर्णी यांनी अध्यक्षांना सुचवले की जरी इतर कार्यक्रम होऊ शकत नसले तरी दोघांनी येऊन ही पूजा दर रविवारी करावी. **२२ मार्चच्या रविवार पासून सध्या बंधु कौस्तुभ भडभडे आणि बंधु  दुष्यंत वैद्य सकाळी ९.३० ला ही पूजा करत आहेत.** लॉजच्या पदाधिकाऱ्यांतर्फे या दोघांचे मनःपूर्वक आभार. मधे एक दोन वेळा भगिनी वर्षा मोटवानी यांनी ह्या पूजेला उपस्थिती लावली. दि. ५ जुलै २०२० च्या पूजेला बंधु बुरसे, नितीन व नीला अभ्यंकर, बंधु तेंडूलकर उपस्थित होते. रविवार १२ जुलै २०२० च्या पूजेस बंधु बुरसे, नितीन व नीला अभ्यंकर, बंधु रायरीकर हे उपस्थित होते.

२) रविवार १२ जुलै २०२० रोजी सकाळी १०.१५ ला लॉजची व्यवस्थापन समितीची सभा घेण्यात आली.

◆ **दी सांगली लॉज, सांगली –**

सांगली लॉजचे जेष्ठ विचारवंत व जागतिक स्तरावरील थिऑसॉफिकल सोसायटीच्या लायब्ररीमधे अड्यार येथे कार्यरत असलेले बंधु चंद्रकांत शिंदे यांनी कोरोना कोविड-१९ च्या दुषित वातावरणामुळे त्रस्त अशा काळात जो उपक्रम हाती घेतला आहे तो फार कौतुकास्पद व वाखाणण्याजोगा आहे. **"Meditation"** या शिर्षकाखाली एक विचारमालिका नित्य स्वहस्तेलिखित, स्वयंस्फूर्त विचार, शेजारी साजेसे संयुक्तिक बोधचित्र, उन्नत विचारांनी व अपार कष्टाने स्वतः तयार करून नित्यदिनी थिऑसॉफीच्या संलग्न प्रत्येक ग्रुपवर पोस्ट करून प्रत्येक सभासदास प्रसन्न, उत्स्फुर्त व उन्नत विचारांनी प्रवाहित करत आहेत. **या त्यांच्या उपक्रमास म. थि. फे. तील सर्व सभासदांतर्फे हार्दिक शुभेच्छा, अभिनंदन व धन्यवाद!**

★★★

---

## Mahatma Says

2. In common with many, you blame us for our great secrecy. Yet we know something of human nature, for the experience of long centuries - aye, ages - has taught us .... so long as science has anything to learn and a shadow of religious dogmatism lingers in the hearts of the multitudes, the world's prejudices have to be conquered step by step, not as a rush.

3. The mysteries never were, never can be, put within the reach of the general public, not, at least, until that longed for day when our religious philosophy becomes universal.

4. The adept is the rare efflorescence of a generation of enquirers; and to become one, he must obey the inward impulse of his soul irrespective of the predential considerations of worldly science and sagacity.

# दी थिऑसॉफिकल सोसायटी

मुख्य कार्यालय : अड्यार (चेन्नई) ६०० ०२०.
e-mail : secy.hq@ts-adyar.org
website : www.ts-adyar.org

**आंतरराष्ट्रीय अध्यक्ष** : बंधु टीम बॉईड, अड्यार, चेन्नई.

**भारतीय शाखा**

**कार्यालय** : थिऑसॉफिकल सोसायटी, कामाच्छा, वाराणसी - २२१ ०१०.
फोन : (०५४२) २४५०७७६, २४००७७३
e-mail : theosophyvns@gmail.co
website : www.theosophy-india.org

**महासचिव** : श्री. प्रदिप गोहील **कोषाध्यक्ष** : बंधु व्ही. नारायणन

**मराठी थिऑसॉफिकल फेडरेशनची कार्यकारिणी**

**अध्यक्ष** : ॲड. संजय दि. पोटे
२, चिंतामणी अपार्टमेंटस्, प्लॉट नं ७२, उजवी भुसारी कॉलनी,
कोथरूड, पुणे ४११०३८. मोबाईल नं. : ७७४४९१०७८७

**उपाध्यक्ष** : बंधु प्रा. आर. सी. माळी
सांगली ४११००४. मो. नं. : ९९२२२३१७८८

**सचिव** : बंधु अरूण मा. पालकृत
इंद्रप्रस्थ, ए१/११, साई चौकाजवळ, न्यू सांगवी, पुणे ४११०६१.
फोन : ९४२२०३६७०२

**कोषाध्यक्ष** : बंधु कौस्तुभ भडभडे
पुणे ४११००४. मो. नं.: ९६२३४४८२४३

**उपसचिव** : भगिनी प्रवीणा शाह, खामगाव.

**कार्यकारिणी सदस्य** : बंधु जे. के. जाधव बेळगाव, बंधु डी. एस. कारखानीस सांगली, बंधु ए. पी. लोखंडे नागपूर, बंधु एस. के. विसाळ मालेगाव, भगिनी एस. एन. मेहेत्रे नागपूर, बंधु ॲड. एन. डी. राऊत अमरावती, बंधु डॉ. ए. एस. सोनोने अकोला, बंधु एन. एन. राऊत अकोला, बंधु प्रा. एन. डी. अभ्यंकर पुणे (आमंत्रित), बंधु प्रा. सी. ए . शिंदे अड्यार, चेन्नई (इंडियन कॉन्सिल रिप्रेझेंटेटिव्ह.)

**विश्वबंधुत्व संपादक मंडळ** : बंधु नितीन अभ्यंकर, बंधु शशांक बुरसे,
बंधु ए. एस. सोनोने, भगिनी नीला अभ्यंकर.

**फेडरेशन कार्यालय : मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन**

द्वारा : पूना लॉज, ९१८ शिवाजीनगर, गणेशवाडी, बी.एम्.सी.सी.रोड, पुणे ४११ ००४.
फोन : ०२०-२५६७०४१८

# थिऑसॉफिकल सोसायटी

## तीन उद्दिष्टे

१. जात, धर्म, लिंग व वर्ण हे भेद न करता मानवजातीच्या विश्वबंधुत्वाचे जिवंत केंद्र बनविणे.

२. तौलनिक धर्म, तत्वज्ञान, विज्ञान यांच्या अध्ययनास उत्तेजन देणे.

३. अनाकलनीय सृष्टिनियम व मानवातील सुप्त शक्तींचे संशोधन करणे.

## तीन महान सत्ये

१. माणसाचा आत्मा अमर आहे, त्याच्या विकासाला आणि वैभवाला सीमा नाही.

२. जे तत्व जीवन देते, ते आपल्या आत तसेच बाहेरही वास करते. ते अमर व सदा कल्याणकारी आहे. ते ना ऐकू येते, ना दिसते, ना हुंगता येते; पण ते जाणण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या मनुष्याला अनुभवगम्य आहे.

३. प्रत्येक माणूस स्वत:च स्वत:चा एकमेव शास्ता आहे. स्वत:ला प्रकाशात किंवा अंध:कारात ठेवणारा तोच, जीवन, पुरस्कार, शिक्षा हे त्याचे हुकुम.

## विचार स्वातंत्र्य

थिऑसॉफिकल सोसायटी जगात दूरदूर फोफावली आहे. सर्व धर्मांचे अनुयायी, आपआपले धार्मिक सिद्धांत, शिकवण व श्रद्धा यांचा त्याग न करता सोसायटीचे सभासद झाले आहे व होत आहेत. म्हणून आता हितावह (desirable) हे आहे की सर्वांना हे पक्के माहित असायला हवे की असे कोणतेही सत्य वा सिद्धांत किंवा मत नाही, मग ते कोणीही सांगितलेले अथवा शिकवलेले असो; जे सोसायटीच्या कोणत्याही सभासदावर बंधनकारक असू शकेल. सोसायटीच्या सभासदाने ते मान्य करावे किंवा नाही याचे त्याला पूर्ण स्वातंत्र्य आहे. कोणाही टीचरला किंवा लेखकाला एच्. पी. ब्लॅव्हॅटस्की बाईंपासून ते आजपर्यंत आपले मत व उपदेश, शिकवण सभासदावर लादण्याचा अधिकार नाही. कोणत्याही विचार प्रवाहाबरोबर जाण्याचा, विचार-पंथाचा स्वीकार करण्याचा हक्क त्याला आहे, पण त्याचबरोबर आपली पसंती इतरांवर त्याला लादता येणार नाही. सभासदाचा त्याच्या वैयक्तिक मतामुळे मतदानाचा हक्क आणि निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून उभे राहण्याचा हक्क काढून घेता येणार नाही. मते अथवा श्रद्धा यांमुळे काही विशेष अधिकार मिळणार नाही किंवा शिक्षाही होणार नाही. थिऑसॉफिकल सोसायटीच्या सर्व सभासदांना जनरल कौन्सिलची कळकळीची विनंती आहे की, त्यांनी सोसायटीच्या या मूलभूत तत्वांचा आदर करून त्यांना अबाधित राखावे, त्यांचे संरक्षण करावे व त्याबरहुकुम आचरण करावे, सौजन्य बाळगून व इतरांची कदर करून निर्भयपणे मतप्रदर्शन व प्रगटीकरणाचा हक्क गाजवावा.

---

**संपर्क : 'विश्वबंधुत्व' – मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन**

९१८, शिवाजीनगर, गणेशवाडी, डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४.

दूरध्वनी:(०२०) ५६७०४१८

**Periodical Vishva Bandhutva**

**Reg. No. MAHMAR / 2003 / 7740**

# Printed Books

To,

From :

**Secretary,**
Marathi Theosophical Federation
C/O - The Poona Lodge, Theosophical Society
918, Shivajinagar, Ganeshwadi,
Deccan Gymkhana, Pune 411004.